जि-३।१५

# माणगाव येथील मा. जिल्हा सत्र न्यायधीश यांचे कोर्टात

**पाली पोलीस ठाणे ७९/२०२५**
**सेशन केस नं. ६१/२०२५**

**राहूल शिवाजी पवार**
वय २६ वर्षे, धंदा - नोकरी
रा. खोपोली, ता.खोपोली, जि.रायगड ... **अर्जदार**

Call say of LD-APP

Addl. Sessions Judge & Judge, Special Court Mangaon - Raigad 23/04/2026

**विरुध्द**

महाराष्ट्र सरकार
पाली पोलीस स्टेशन ... **सामनेवाला**

Rs.5 INDIA FIVE RUPEES 20 APR 2026 ५ रु. पाँच रुपये

**भारतीय नागरीक सुरक्षा सविता कलम ४८३ प्रमाणे पाली पोलीस ठाणे गु.र.क्र.७९/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४), ३१०(२), ३११, १११, १२७(२) सह शस्त्र अधिनियम कलम ४,२५ मधील गुन्ह्यामध्ये जमिन अर्ज .**

**सदरहू अर्जदार मा.न्यायालयास कळवितो की,**

१) सदर प्रथम खबरी अहवाल दि. १३/०७/२०२५ रोजी पाली पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. १०४/२०२५ प्रमाणे फिर्याद संभाजी दामा वाघमारे याच्या सांगण्यावरुन घेण्यात आला.

२) दाखल गुन्ह्याची हकिगत अशी की, दिनांक २७/०७/२०२५ रोजी ०१.४५ वा ते ०३.१५ चे दरम्यान अंदाजे २५ ते ३० वयोगटातील ५ अनोळखी इसमांनी फिर्यादी संभाजी दामा वाघमारे तसेच गावातील इतर साक्षीदार यांचे घराचे दरवाजे कशाने तरी तोडुन त्यावाटे आत प्रवेश करुन फिर्यादी व फिर्यादी यांचे पत्नीला लोंखडी कोयत्याचा धाक दाखवून फिर्यादी यास हाताने मारहाण केली. तसेच फिर्यादी यांच्या पत्नीच्या गळयातील छोटे सोन्याचे मंगळसूत्र व दोन्ही कानातील सोन्याचे कर्णफुले हिसकावून घेतले तसेच बेडरुमच्या कपाटाचे लॉक तोडून सोन्याचे दागीने, जीओ कंपनीचा मोबाईल व रोख रक्कम दरोडा टाकून

घेवून गेले व त्यांना धमकावून त्यांच्या घराचे दरवाजाला बाहेरुन कडी लावून त्यांना घरात कोंडून ठेवले. तसेच साक्षीदार किसन गोपाळ चव्हाण, वय ७५ वर्षे, रा.गोंदाव, ता.सुधागड यांचे घरात व साक्षीदार चंद्रकांत पाठारे, वय ५० वर्षे, रा. गोंदाव यांच्या घरात दरोडा टाकला. तसेच साक्षीदार नथुराम भिकोट, वय ५४ वर्षे, रा.गोंदाव, ता.सुधागड यांच्या घरात व भगवानदास केवट, वय ५५ वर्षे, रा. हातोंड, ता.सुधागड यांच्या घरात दरोडा टाकण्याचा प्रयत्न केला म्हणून दिनांक २७/०७/२०२५ रोजी १७.३९ वाजता भारतीय न्याय संहिता कलम ३११, ३०९(४), १२७ (२) सह शस्त्र अधनियम कलम ४,२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**३)** सदरहू अर्जदार कळवितात की, अर्जदार यांना पाली पोलीस ठाणे गु.र.नं. ७९/२०२५मध्ये दि. १२/०४/२०२६ रोजी अटक करण्यात आलेली होती. तरी अर्जदार यांनी पाली प्रथम वर्ग न्यायालयाकडून दि. १७/०४/२०२६ रोजी न्यायालयीन कोठडी देण्यात आली. तेव्हा पासून आजपर्यन्त आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे.

**४)** दि.१३/१०/२०२५ रोजी प्रथमवर्ग न्यायदंड अधिकारी याकडून सदर गुन्ह्यात भा.न्यां.स.कलम ३१०(२) १११ वाढवून लावलेले आहेत.

**५)** अर्जदार यांनी नमूद कथनाप्रमाणे कोणताही गुन्हा केलेला नाही आरोपीचा सदर गुन्ह्याशी कोणताही संबध नाही.

**६)** अर्जदार हे महाराष्ट्र राज्यातील रायगड, जिल्ह्यातील कायमस्वरुपीचे रहिवासी आहे तेथे त्याचे घरदार आहे. शेतीवाडी आहे. त्यामुळे जामीन मिळाल्यास कोठेही पळून जाणार नाही.

**७)** सदर गुन्ह्यातील चार्ज शीट माणगाव कोर्टात दाखल झालेली आहे. सदर चार्जशीट अवलोकन केला असता सदर आरोपी विरुध्द कोणताही ठोस पुरावे आढळून येत नाही.

८) सदर  केस चा निकाल लागण्यास भरपूर कालावधी लागणार आहे तोपर्यत अर्जदार यांना न्यायालीन कोठडीत ठेवणे योग्य नाही.

९) सदरकामी पोलीसामार्फत तपास पूर्ण झाला असून मे कोर्टात चार्जशीट दाखल करण्यात आली आहे. सबब आरोपी यांचेकडून आता कोणताही अधिक तपास करचा नाही.

१०) अर्जदार यांना आत्तापर्यत कोणत्याही गुन्ह्यात शिक्षा झालेली नाही.

११) सदर गुन्ह्याची शिक्षा जन्मठेप किंवा फाशी नाही.

१२) आरोपीस जमिनावर सोडल्यास सदर केस मधील साक्षीदारावर कोणत्याही प्रकारचे दबाव आणणार नाही.

१३) आरोपीना जमिनावर सुटका हा नियम आहे आणि गजाआड ठेवणे हा अपवाद आहे तसेच सुनावणीपूर्व शिक्षा म्हणून जमीन नाकारणे हेही न्यायेचित आणि साप्रत नाही कारण निम्न न्याय निवडा नुसार जमीन अर्जाचा मुख्य उद्देश जमिनाचा चौकशी दरम्यान हजर राहणे साक्षीदारावर दाब दबाव न आणणे पुराव्यात ढवळा ढवळ न करणे आणि इतर कुठल्याही गुन्हा पासून अलिप्त राहणे असे निम्न निवाडे आहे.

- **खेमलो सखाराम सावंत विरुध्द महाराष्ट्र शासन २००२(१) बॉम्बे सी.आर.६८९.**
- **संजय चंद्र विरुध्द सो.बो.आय.२०११ ऑल एस.सी.आर २९३०**
- Prabhakar Tewari VS state of U.P. & anr (2020 supreme(sc)25)

१८) अर्जदार जमिनावर सोडल्यास योग्य व लायक  जामीन देण्यास तयार आहे.

१९) सदर गुन्ह्यातील पाली पोलीस ठाणे गु.र.नं. ७९/२०२५ मध्ये आरोपी १) अजय एकनाथ चव्हाण २) सुनिल प्रकाश चव्हाण ३) आकाश पंजाबराव चव्हाण यांची पाली कोर्टाने बेल मंजूर केली आहे. तर आपल्या मे. कोर्टाने आरोपी क्र.

५ सुजल महेश चव्हाण, ६) मल्हारी भानूदास चव्हाण यांची बेल मंजूर झालेली आहे.

२०) आरोपी मे.कोर्ट च्या अटी शर्तीचे पालक करण्यास तयार आहे.

२१) अर्जदार या अर्जाव्यतिरिक्त इतर न्यायालयात अथवा उच्च न्यायालयात जमिनीचा अर्ज दाखल केलेला नाही.

**२२)तरी मे कोर्टास विनंती की**

अ) सदर केस मधील (पाली पोलीस ठाणे गु.र.नं. ७९/२०२५) अर्जदार जमिन अर्ज मंजूर करण्यात यावा.

ब) इतर योग्य न्यायाचे हुकूम अर्जदार याचे लाभात करावे

येणेप्रमाणे विनंती असे

**माणगाव**

N. A. Jagtap

**दिनांक - २३/०४/२०२६** **आरोपी तर्फे वकील**

**ॲड. एन.ए. जगताप**

S. C. NO. 61 of 2025

Exh. 1

O (Dt. 23/04/2026)

Now, it is brought to my notice that the accused named Rahul Shivaji Pawar - has not been chargesheeted in this matter. He is shown absconding. Hence, the bail appln. in this proceeding can not be decided. Misc. cr. Appln. separate could be filed. Hence, this appln. is disposed of, as not maintainable. Adv. for Accused [illegible] is absent. Inform him. ASJ Mangaon.